(इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णयाचा मराठी भाषेत अनुवाद.)

**मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अधिकारितेमद्धे**

**फौजदारी अपीलीय अधिकारिता**

**<u>फौजदारी पुनरीक्षण अर्ज क्र. ७६/२०२३</u>**

श्री. प्रेसेनजीत मानबेंद्र सेन ] अर्जदार

विरुद्ध

महाराष्ट्र राज्य ] उत्तरवादी

....................

* श्री. सत्यव्रत जोशी सोबत श्री. ओंकार नेवगी, अर्जदाराचे वकील.

* कु. डी. एस. कृष्णअय्यर, राज्याकरिता विद्वान अतिरिक्त सरकारी वकील.

....................

**न्यायमंच : न्या. मिलिंद एन. जाधव**

**दिनांक : ०२ जानेवारी २०२५**

**<u>न्यायनिर्णय:</u>**

१. सध्याचा फौजदारी पुनरीक्षण अर्ज (संक्षिप्ततेसाठी "सीआरए") न्यायचौकशी न्यायालय आणि सत्र न्यायालयाने पारित केलेल्या दुहेरी न्यायानिर्णयांना आव्हान देतो. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी , पिंपरी, पुणे (संक्षिप्ततेसाठी "जेएमएफसी") यांनी

२८.०९.२०२१ रोजी संक्षिप्त फौजदारी प्रकरण (संक्षिप्ततेसाठी "एससीसी") क्र. ११६४/२०१८ मध्ये दिलेल्या न्यायनिर्णयाला आव्हान देण्यासाठी अर्जदाराने सध्याची पुनरीक्षण अर्ज दाखल केला आहे, ज्यामध्ये अर्जदाराला भारतीय दंड संहिता, १८६० (संक्षिप्ततेसाठी "आयपीसी") च्या कलम २७९ अन्वये दोषी ठरवले आहे आणि रु.५००/- दंडासह तीन महिने सश्रम कररवास (संक्षिप्ततेसाठी "आर.आय.") भोगण्याची शिक्षा ठोठावली. अर्जदाराला आयपीसी कलम ३०४-ए अन्वये दोषी ठरवून सहा महिने सश्रम कारावासासह रु.५,०००/- दंडाची शिक्षा ठोठावली आणि त्यात कसूर केल्यास एक महिन्याचा सश्रम कारावास भोगण्याची शिक्षा ठोठावली. त्यानंतर, अर्जदाराने सत्र न्या याधीश, पुणे यांच्या न्यायालयात फौजदारी अपील क्रमांक १५४/२०२१ दाखल केले, ज्यांनी त्यांच्या दिनांक २४.०३.२०२३ च्या न्यायानिर्णयाद्वारे (आक्षेपित न्यायनिर्णय) वरील दोषसिद्धी आणि शिक्षेवर शिक्कामोर्तब केले आहे.

२. या न्यायालयाने (न्यायमंच : न्या. सारंग वि. कोतवाल) २७.१०.२०२३ रोजी सध्याच्या सीआरए मध्ये दाखल केलेल्या अंतरिम अर्ज क्रमांक ३९२८/२०२३ मध्ये खालील आदेश दिला:-

"१. अंतिम सुनावणीसाठी फौजदारी पुनरीक्षण अर्ज सूचीबद्ध करण्यासाठी हा अर्ज आहे.

२. अर्जदाराच्या विद्वान वकिलांनी सादर केले की, अर्जदार चांगली अर्हता असलेला तरुण माणूस आहे. तो आय. टी. क्षेत्रामध्ये कार्यरत आहे. प्रलंबित पुनरीक्षण अर्जामुळे त्याला नोकरी मिळत नाही; आणि ही त्याच्या कारकीर्दीची आणि आयुष्याची प्रमुख वर्षे आहेत, म्हणून, पुनरीक्षण अर्जावर लवकरात लवकर गुणवत्तेच्या आधारावर निर्णय घेणे आवश्यक आहे.

३. या युक्तिवादांचा विचार करून ११.१२.२०२३ पासून सुरू होणाऱ्या साप्ताहिक अंतिम सुनावणी बोर्डावर पुनरीक्षण अर्ज जोडण्यात यावा. अभिलेख आणि कार्यवाही मागविण्यात यावी. त्यानुसार अंतरिम अर्ज निकाली काढला जातो.

३. वरील बाबी लक्षात घेता, अंतिम युक्तिवाद पूर्ण झाल्यावर मी १०.१२.२०२४ रोजी अर्जदार आणि विद्वान अतिरिक्त अभियोग वकील यांचे म्हणणे ऐकले.

४. अभियोग पक्षाचे प्रकरण थोडक्यात खालीलप्रमाणे आहे :-

४.१ अभियोग पक्षाने दिलेल्या माहितीनुसार, १७.०३.२०१८ रोजी रात्री ९ वाजणेच्या सुमारास श्री. रामसावरे बलराज पाल (स. सा. -३) व त्याचे मामा बच्छालाल, दोघेही चौधरी नगर, भोसरी, पुणे चे रहिवासी, दोघे जण दोन वेगवेगळ्या सायकलवरून संतनगर चौकातून स्पाइन रोड मार्गे गोडाऊन चौक येथे जात होते. त्यावेळी कुठेतरी जयगणेश साम्राज्य चौक जवळ एक आय-२० कार क्र. केए-०३-एई-७७६० ने

बच्छालाल पाल यांच्या सायकलला पाठीमागून धडक दिल्याने ते रस्त्यावर पडले आणि ते गंभीर जखमी झाले. अभियोग पक्षाचे प्रकरण असे आहे की अर्जदार कार चालवत होता. या कारमध्ये अर्जदारासह शुभंकर बैराणी, कु. उत्तरा राशीनकर, कु. भूमिका शर्मा हे सहप्रवासी होते. त्यांनी तात्काळ बच्छालाल यांना आपल्या कारमधून संत ज्ञानेश्वर रुग्णालयात त्यांच्या जखमांवर उपचार करण्यासाठी दाखल केले. बच्छालाल यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रामसावरे पाल यांनी बच्छालाल यांचे वडील अमृतलाल यांना घटनेची माहिती दिली. उत्तर प्रदेशातील कौशांबी जिल्ह्यातील आपल्या गावातून आल्यावर अमृतलाल यांनी बच्छालाल यांची रुग्णालयात २०.०३.२०१८ रोजी भेट घेतली. त्यांनी अर्जदारा विरोधात एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. सुरुवातीला आयपीसी च्या कलम २७९, ३३८ आणि मोटर वाहन अधिनियमा, १९८८ (संक्षिप्ततेसाठी "एमव्ही अधिनियम") च्या कलम ११७ आणि १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, २०.०३.२०१८ रोजी बच्छालाल यांचा मृत्यू झाल्याने आयपीसी कलम ३०४-ए जोडण्यात आले. अर्जदाराला २०.०३.२०१८ रोजी अटक करण्यात आली आणि नंतर जामिनावर सोडण्यात आले. वरील कलमान्वये दंडनीय गुन्ह्यांसाठी निशाणी "१४" खाली अर्जदारावर आरोप निश्चित करण्यात आले. त्याने गुन्हा कबूल केला नाही आणि त्याची न्यायचौकशी करण्यात आली. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ३१३ अन्वये (संक्षिप्ततेसाठी "सीआरपीसी") त्यांचा

जबाब निशाणी "३१" खाली नोंदविण्यात आला होता. ही कार भाड्याची असल्याने आणि घटनेच्या वेळी एक अनोळखी ड्रायव्हर कार चालवत असल्याने तो गाडी चालवत नव्हता, असा युक्तिवाद त्याने न्यायाचौकशी न्यायालयासमोर केला. बच्छालाल यांच्या सायकलला पाठीमागून धडक दिली तेव्हा कार भरधाव वेगात चालवली जात नव्हती.

५. अर्जदाराचे विद्वान वकील श्री. जोशी यांनी मला खटल्याचे पुरावे आणि अभिलेख वाचून दाखवले आणि सविस्तर युक्तिवाद केला. सुरुवातीला, ते सादर करतात की घटनेनंतर एफआयआर दाखल करण्यास झालेला ३ दिवसांचा बेसुमार उशीर खालील न्यायालयांद्वारे विचारात घेतला गेला नाही. जखमी बच्छालाल यांना रामसावरे पाल यांना बरोबर घेऊन अर्जदार व त्यांच्या मित्रांनी १७.०३.२०१८ रोजी रुग्णालयात दाखल केले असले, तरी घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असलेल्या रामसावरे पाल यांनी कोणतीही तक्रार दाखल केलेली नाही. २०.०३.२०१८ रोजी रुग्णालयात भेटल्यानंतर बच्छालाल च्या वडिलांनी एफआयआर दाखल केला आहे जो प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही, कारण त्यावेळी ते उत्तर प्रदेशातील आपल्या गावी होते. अर्जदार आणि त्याच्या मित्रांनी पुण्यातील ए. एस. जस्ट राईड टूर्स अँड ट्रॅव्हल्स कंपनी नावाच्या भाड्याच्या कंपनीतून ड्रायव्हरसह संबंधित कार भाड्याने घेतली. ते सादर करतात की खालील दोन्ही न्यायालयांसमोर अर्जदाराचे हे सुसंगत प्रकरण आहे की अभियोग पक्ष हे सिद्ध करण्यात अपयशी ठरला आहे की कार ड्रायव्हर शिवाय भाड्याने घेतली गेली होती

आणि केवळ याच कारणास्तव अर्जदाराला कारचा ड्रायव्हर म्हणून दोषी ठरवणयात आले आहे. ते सादर करतात की खालील दोन्ही न्यायालयांनी स. सा. १ - ए. एस. जस्ट राइड्ड टूर्स अँड ट्रॅव्हल्स कंपनीचे प्रतिनिधी आणि टीम लीडर ज्यांनी आपल्या जबाबात म्हटले आहे की अर्जदार आणि त्याच्या मित्रांनी ड्रायव्हर शिवाय त्यांच्या ऑनलाइन ॲप द्वारे संबंधित कार भाड्याने घेतली होती आणि केवळ या जबाबावर अर्जदाराला दोषी ठरवले जाते.

५.१. या घटनेची प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असलेल्या उत्तरा राशीनकर या कारमधील एकाने न्यायचौकशी न्यायालयासमोर साक्ष दिली आहे की, अर्जदार संबंधित कार चालवत नव्हता. ते सादर करतात की निशाणी - "२९" खालील आरटीओ अहवालात कारच्या बंपरला किरकोळ धडक बसली होती आणि कोणतीही गंभीर हानी झाली नाही, ज्यामुळे कार भरधाव वेगाने चालविली गेली नाही याची पुष्टी होते. ते सादर करतात की निशाणी - "२९" खालील आरटीओ अहवाल या गोष्टीची पुष्टी करतो की कारमध्ये स्पीड गव्हर्नर (वेग नियंत्रण यंत्रणा) बसवण्यात आला होता आणि अन्यथा ती जास्त वेगाने चालविली जाऊ शकत नाही.

५.२. अर्जदाराची ओळख आणि पूर्वचरित्र लक्षात घेता जो उच्चशिक्षित तरुण आहे आणि त्याच्यावर इतर कोणताही फौजदारी खटला प्रलंबित नाही, त्याला अपराध्यांची

परिवीक्षा अधिनियम, १९५८ मधील तरतुदींचा लाभ द्यायला हवा होता कारण तो मृताच्या नातेवाइकांना भरमसाठ नुकसान भरपाई देण्यास तयार आणि राजी आहे. याच आधारावर ते एमएसीपी प्रकरण क्रमांक ३०६/२०१८ मध्ये दिलेला निशाणी "१" खालील दिनांक ०५.०४.२०२४ चा आदेशही ते माझ्यासमोर ठेवतील, जो मध्यस्थ अहवालाचा आणि त्यामधील अर्जदार म्हणजेच मृत बच्छालालची पत्नी आणि ए.एस. जस्ट राइड्स टूर्स अँड ट्रॅव्हल्स कंपनी यांच्यात सलोख्याने झालेल्या तडजोडीचा संदर्भ देत, ज्याद्वारे विरोधक क्रमांक ३ म्हणजे नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड कडून रु.२०,७५,०००/- प्राप्त झाल्यावर, दोन्ही विरोधक क्रमांक १ (सध्याचा अर्जदार) आणि विरोधक क्रमांक २ (ए.एस. राइड्स टूर्स अँड ट्रॅव्हल्स कंपनी ) यांना एमएसीपी प्रकरण क्रमांक ३०६/२०१८ मध्ये दोषमुक्त करण्यात आले आहे.

५.३ ते सादर करतात की संपूर्ण अभियोग पक्षाच्या खटल्यात, अर्जदाराला वाहन चालविण्याच्या कृतीशी जोडण्याचा कोणताही थेट पुरावा नाही आणि खालील दोन्ही न्यायालयांनी अर्जदाराला दोषी ठरवताना घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असल्याचा दावा करणाऱ्या स. सा. - ३ म्हणजे रामसावरे पाल च्या म्हणण्यावर विश्वास ठेवला आहे आणि स्वीकारला आहे. तसे असेल तर रामसावरे पाल यांनी अपघातानंतर लगेचच कोणतीही तक्रार दाखल केली नाही, ही कुतूहल निर्माण करणारी गोष्ट आहे. रामसावरे पाल यांनी न्यायालयासमोर दिलेल्या जबाबात मृत बच्छालाल यांच्या सायकलमागे

सायकल चालवत असल्याचे नमूद केले असले, तरी घटनेच्या तारखेला पोलिस अधिकाऱ्याने नोंदवलेल्या जबाबात या वस्तुस्थितीचा अजिबात उल्लेख नाही. संबंधित कारचा फोटो काढल्यानंतरच गाडी थांबली, असे त्यांचे पुढील विधानही घटनेच्या तारखेला पोलिस अधिकाऱ्याने नोंदवलेल्या जबाबात नमूद केलेले नाही. स. सा. - ३ ने केलेल्या वरील महत्वाच्या सुधारणा घटनेच्या तारखेस पोलिस अधिकाऱ्याने नोंदवलेल्या स्वत:च्या जबाबाशी स्पष्टपणे विसंगत आहेत, असे ते ठामपणे सांगत आहेत.

५.४ ते सादर करतात की अपघातात एखाद्या व्यक्तीचा जीव गेला ही दुर्दैवी परिस्थिती असली तरी आयपीसीच्या कलम २७९ सह ३०४-ए अन्वये आणि एम.व्ही. अधिनियमाच्या तरतुदींसह आरोप लागू करण्यासाठी, अभियोग पक्षाच्या पुराव्यांवरून कोठेही हे सिद्ध झाले नाही की संबंधित कार अर्जदाराने चालविली होती, की ती भरधाव वेगाने किंवा बेदरकारपणे आणि हयगयीने चालवली गेली ज्यामुळे बच्छालालच्या सायकलला धडक देण्यात आली. स. सा. -३ - रामसावरे पाल हे मृताचे प्रत्यक्ष स्वारस्य साक्षीदार असल्याने त्यांची तोंडी साक्ष सुधारणा आणि विरोधाभासांनी भरलेली आहे आणि खालील दोन्ही न्यायालयांनी ती स्वीकारायला नको होती, असे ते ठामपणे सांगतात. ते हा मुद्दा पटवून देण्याचा प्रयत्न करतील की जर संबंधित कार चालकाने, जो प्रत्यक्षात जबाबदार असेल त्याने बेदरकारपणे किंवा निष्काळजीपणाने

चालविली असती तर रामसावरे पाल - स. सा. -३ ने घटनेच्या तारखेलाच तक्रार दाखल केली असती. स. सा. ३ हा मृत बछलाल चा पुतण्या असल्याने स्वारस्य साक्षीदार आहे आणि म्हणूनच केवळ त्याच्या जबाबावर अवलंबून राहणे आणि अभियोग पक्षाच्या इतर साक्षीदारांच्या जबाबाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करणे हे सध्याच्या खटल्यातील वस्तुस्थितीतील पुराव्यांचे योग्य मूल्यमापन नाही आणि म्हणूनच आक्षेपित निर्णय प्रथमदर्शनी आहेत

५.५ अभियोग पक्षाने विलंबाचे कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नसल्यामुळे एफआयआर दाखल करण्यास उशीर झाल्याबद्दल ते प्रश्न उपस्थित करतात. मृत बछलाल यांचे वडील अमृतलाल (स. सा. -४) यांनी अपघात घडल्याची ऐकीव माहिती मिळताच एफआयआर दाखल केला आहे. ते सादर करतात की, या संदर्भात ज्याअर्थी निशाणी - "२९" येथील बच्छालाल यांच्या सायकलीवर आघात झाल्याच्या अहवालास महत्व प्राप्त झाले, ज्यात नोंद करण्यात आले की संबंधित कारवर वेग नियंत्रण यंत्रणा बसवलेली होती आणि महत्वाचे की अपघात /घटनेनंतर एकही एयर बॅग आघातामुळे फुगलेली/उघडली गेली नाही आणि त्या शाबूत राहिल्या होत्या, या वस्तुस्थितीला खालील दोन्ही न्यायालयांनी पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. त्यानंतर ते या अहवालाकडे माझे लक्ष वेधत आहेत, ज्यात म्हटले आहे की, काही ओरखाडे वगळता संबंधित कारच्या बंपरचे कोणतेही मोठे नुकसान झालेले नाही आणि सर्वात ढळढळीत वस्तुस्थिती म्हणजे

अपघातानंतर अभियोग पक्षाने बच्छालाल यांच्या संबंधित सायकलचा पंचनामा सादर केला नाही.

५.६. वरील सर्व बाबींवर तो असे सादर करेल की, अभियोग पक्षाने अर्जदाराच्या दोषसिद्धीसाठी सर्व वाजवी शंकांच्या पलीकडे आपली बाजू सिद्ध करण्यासाठी तर्कप्रबळ आणि संबंधित पुरावे अभिलेखावर सादर केले नाहीत आणि वरील मुद्दे अनेक प्रश्न अनुत्तरित ठेवतात. या प्रकरणातील वस्तुस्थिती तपासून पाहिली असली तरी त्याची योग्य दखल घेतली गेली नाही, असा युक्तिवाद त्यांनी केला. स. सा. -५ - संबंधित कारचा सहप्रवासी आणि घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांच्या जबाबाकडे ते माझे लक्ष वेधतात आणि असे सादर करतात की अपघाताच्या वेळी ती कारमध्ये बसली होती आणि घडलेला प्रकार स्वतःच्या डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहिला. कथित घटना घडली तेव्हा संबंधित कार परत येण्यासाठी यू-टर्न घेत होती, असे तिने स्पष्टपणे नमूद केले आहे आणि अपघातस्थळ हे व्यस्त आणि वर्दळीचे क्षेत्र असल्याचे नमूद केले आहे.

५.७ आयपीसीच्या कलम २७९ अन्वये बेदरकारपणे आणि हयगयीने वाहन चालविल्याबद्दल एखाद्या व्यक्तीला दोषी ठरवण्यासाठी, अभियोग पक्षाने हे निश्चितपणे सिद्ध करणे आवश्यक आहे की वाहन त्याने प्रथम इतक्या बेदरकारपणे आणि हयगयीने चालविले होते की यामुळे मानवी जीवाला धोका निर्माण होईल किंवा कोणालाही दुखापत किंवा इजा होण्याची शक्यता आहे. घटनेच्या वेळी संबंधित वाहनातील

सहप्रवासी असलेली स. सा. -५ वगळता अन्य कोणताही प्रत्यक्षदर्शी किंवा अन्य कोणताही स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. प्रदर्शन-२७ खालील जागेच्या पंचनाम्यात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, अपघातस्थळी संबंधित कार बेदरकारपणे किंवा निष्काळजीपणे किंवा भरधाव वेगाने चालविल्याचे कोणतेही चिन्ह दिसले नाही. ते असे सादर करतात की बच्छालाल यांचा उपचारा दरम्यान घटनेच्या तीन दिवसांनंतर मृत्यू झाल्याने आणि स. सा. - ३ म्हणजे रामसावरे पाल (मृताचा पुतण्या) यांच्या जबाबाच्या आधारे, ज्याचे पुरावे सुधारणा आणि भौतिक विरोधाभासांनी भरलेले आहेत=, या प्रकरणातील अर्जदाराची दोषसिध्द्धी हे स्पष्टपणे मानवी भावनांनी प्रेरित आहे,

५.८. वरील बाबींच्या आधारे ते असे सादर करतात की अभियोग खटला, तक्रार, दोषारोपपत्र एकत्र वाचल्यास निःसंशयपणे असे दिसून येईल की अर्जदाराचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी आणि अर्जदार कार चालवत होता ज्यामुळे अपघात झाला आणि बच्छालाल चा मृत्यू झाला अभियोग पक्षाचे पुरावे पुरेसे नाहीत. संबधित कार बेदरकारपणे आणि हयगयीने चालवली जात असल्याच्या कारणास्तव सुद्धा सर्व वाजवी संशयापलीकडे आपली बाजू सिद्ध करण्यात अभियोग पक्ष सपशेल अपयशी ठरला आहे, असा युक्तिवाद त्यांनी केला. त्यामुळे सध्याच्या प्रकरणातील विशिष्ट वस्तुस्थिती आणि पुरावे लक्षात घेता न्यायचौकशी न्यायालयाने दिलेले आणि सत्र न्यायाधीशांनी कायम

ठेवलेले दोन्ही आक्षेपित निर्णय न्यायाच्या हितासाठी रद्द करण्यात यावेत, असा युक्तिवाद त्यांनी केला.

६. दुसऱ्या बाजूस, डॉ. कृष्णअय्यर, विद्वान अतिरिक्त अभियोग वकील सादर करतात की घडलेल्या घटनेबद्दल आणि अर्जदाराने चालविलेल्या संबंधित कारच्या सहभागाबद्दल विभिन्नता आहे. त्या हे सादर करतात की अभियोग पक्षाने दोन प्रमुख साक्षीदारांचे पुरावे दिले आहेत ते म्हणजे स. सा. -१ खांडेराव अडप्पा शिरोळे - ए.एस. जस्ट राइड्ज टूर्स अँड ट्रॅव्हल्स कंपनी चे प्रतिनिधि त्यांनी ही साक्ष दिली आहे की, अर्जदाराने त्याच्या तीन मित्रांसोबत पुण्याहून भीमाशंकरला एक दिवस फिरण्यासाठी संबंधित कार भाड्याने घेतली आणि अपघात झाला तेव्हा ते कारमध्ये उपस्थित होते आणि त्यानंतर कंपनीच्या ऑनलाइन ॲपवर कारचा परतीचा वेळ वारंवार ४० तासांपर्यंत वाढवत राहिले. त्या असे सादर करतात की या साक्षीने हे सिद्ध होते की अर्जदार कारचा ड्रायव्हर होता आणि म्हणूनच न्यायचौकशी न्यायालयाने दिलेला निर्णय आणि सत्र न्यायालयाने कायम ठेवलेला निर्णयात हस्तक्षेप करता येणार नाही.

७. मी अर्जदाराचे विद्वान वकील श्री. जोशी आणि डॉ. कृष्णाअय्यर, राज्यासाठीचे विद्वान अभियोग वकील यांचे म्हणणे ऐकले आहे आणि त्यांच्या सक्षम मदतीने या प्रकरणातील अभिलेखाचे अवलोकन केले. विद्वान वकिलांनी सादर केलेल्या युक्तिवादाचा न्यायालयाने योग्य विचार केला आहे.

८.     सध्याच्या प्रकरणात असे दिसून आले आहे की, निशाणी - "१" खाली आरोपपत्र दाखल केले आहे आणि निशाणी - "१४" खाली आरोपपत्र तयार केले  आणि सीआरपीसीच्या कलम ३१३  अंतर्गत अर्जदाराचा जबाब  निशाणी  - "१५" खाली नोंदविला गेला आहे.  अभियोग  पक्षाने सहा साक्षीदारांचे पुरावे सादर केल्याचे दिसून आले आहे. स. सा.१  - खंडेराव अडप्पा शिरोळे आहे ज्याने ए.एस.राइड टूर्स अँड ट्रॅव्हल्स कंपनीच्या वतीने साक्ष दिली आहे.   तो टीम लीडर म्हणून काम करत होता आणि कंपनीने अर्जदाराला १७.०३.२०१८ रोजी सकाळी ८.०० वाजता संबंधित आय-२० कार भाड्याने दिली होती आणि रात्री ८:०० वाजता त्याला कार परत करायची होती. अर्जदाराने रात्री आठ वाजता कार परत केली नाही आणि त्यानंतर कंपनीच्या ऑनलाइन अ ॅपवर कार परत करण्यासाठी ४० तासांपर्यंत मुदतवाढ मागितली. त्यानंतर संशय आल्याने त्यांनी संबंधित कारचा शोध घेतला असता ती भोसरी पोलिस ठाण्याच्या आवारात उभी असल्याचे निदर्शनास आले व चौकशी केली असता सध्याच्या प्रकरणात तिला अपघात झाल्याचे निष्पन्न झाले. त्याने साक्ष दिली आहे की जेव्हा त्याने अर्जदाराला वरील तथ्यांसह समोरासमोर खोदून विचारले तेव्हा त्याने अपघात झाल्याची कबुली दिली. त्यानंतर औपचारिकता पूर्ण करून तपासणी अहवाल तयार करून गाडी पुन्हा कंपनीला सोडण्यात आली, अशी साक्ष त्यांनी दिली आहे. उलटतपासणीत त्याने १७.०३.२०१८ रोजी अर्जदाराला गाडी त्याने जातीने  दिली नाही तसेच तो अपघाताचा साक्षीदार नाही, अशी साक्ष दिली आहे. कोणाच्या चुकीमुळे हा अपघात झाला हे

सांगण्याच्या स्थितीत नसल्याची कबुलीही त्यांनी उलटतपासणीत दिली आहे. स. सा. -१ च्या वरील उलटतपासणीत ही वस्तुस्थिती निर्देशनास आणली नाही की कार अर्जदाराला देण्यात आली होती किंवा अर्जदाराने ड्रायव्हरसह कार भाड्याने घेतली होती. या पैलूवर स. सा. -१ ची साक्ष पूर्णपणे काही सांगत नाही. साधारणपणे कार रेंटल कंपनीकडून दिलेल्या ड्रायव्हर सोबत गाड्या भाड्याने दिल्या जातात. जर या प्रकरणात ड्रायव्हर शिवाय ती भाड्याने दिली गेली असेल तर स. सा. -१ ला असे तपशील आणि वस्तुस्थिती देण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. कंपनीने ड्रायव्हर दिला की नाही, ही वस्तुस्थिती महत्त्वाची आहे. अभियोगपक्षा नुसार, कारमध्ये ४ व्यक्ति / प्रवासी होते, परंतु प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असलेल्या स. सा. -३ च्या जबाबात त्याने आपल्या सरतपासणीत म्हटले आहे की जेव्हा कार समोर थांबली तेव्हा त्याने अपघातानंतर ४ - ५ लोकांना कारमधून उतरताना पाहिले. न्यायचौकशी न्यायालयाने केवळ स. सा. -३ च्या साक्षीवर आपला निर्णय दिला आहे. त्यामुळे कंपनीने दिलेल्या किंवा न पुरवलेल्या कारचालकानी मांडलेल्या मीमांसेवर अभियोग पक्षाच्या खटल्यात सखोल चौकशी केली जात नाही. स. सा. -१ कडून कोणताही तपशील देण्यात आलेला नाही.

९. स. सा. -२ सुधाकर मुरलीधर बोरोटे हे स्थळाच्या पंचनाम्याचे पंच साक्षीदार आहेत. ही घटना १७.०२.२०१८ रोजी घडली असली तरी घटनेच्या ३ दिवसांनंतर २०.०३.२०१८ रोजी स्थळाचा पंचनामा केला जातो. त्यांनी एवढेच सांगितले आहे की,

त्यांना घटना/अपघातस्थळी बोलावण्यात आले होते आणि रामसावरे पाल यांनी अपघाताची माहिती त्यांना सांगितली त्या आधारे जागेचा पंचनामा तयार केला आहे आणि त्यावर त्यांनी स्वाक्षरी केली आहे. अभियोग पक्षाच्या या दोन साक्षीदारांचा विचार केला तर ते दोघेही घटनेचे/अपघाताचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. स. सा. -१ ने आपण अपघात पाहिला नसल्याची स्पष्ट कबुली दिली आहे. या दोन साक्षीदारांची साक्ष अभियोग पक्षाच्या मदतीला येत नाही. त्याऐवजी स. सा. -१ च्या साक्षीने अर्जदार हा कारचा ड्रायव्हर होता हे अभियोग पक्षाची बाजू शक्य तितक्या जास्त प्रमाणात सिद्ध होत नाही.

१०. जोवर स. सा. -४ चा संबंध आहे ते अमृतलाल पाल (अपघातग्रस्त मृत बच्छालाल यांचे वडील) आहेत. स. सा. ४ - मृताचे वडील आणि प्रथम माहिती देणारे यांचे जबाब हे केवळ ऐकीव आहेत. १७.०३.२०१८ रोजी हा अपघात घडल्याची माहिती स. सा. -३ ने त्यांना दिली होती, त्यानंतर ते मुंबईत आले आणि २०.०३.२०१८ रोजी रुग्णालयात बच्छालाल यांची भेट घेतली, जेथे ते त्यांना झालेल्या जखमांवर उपचार घेत होते. घटनेच्या वेळी ते उत्तरप्रदेशातील आपल्या गावी होते आणि त्याने जे काही साक्ष दिली आहे त्याची माहिती स. सा. -३ रामसावरे पाल यांनी दिली आहे, अशी साक्ष त्याने दिली आहे. जखमांवर उपचार सुरू असलेल्या रुग्णालयात बच्छालाल यांची

भेट झाल्याची कबुली त्यांनी उलटतपासणीत दिली आहे. त्याची साक्षही स. सा. -१ आणि स. सा. -२ च्या साक्षीप्रमाणेच अभियोग पक्षाच्या काहीच उपयोगी पडत नाही.

११. अशा प्रकारे, आम्ही स. सा. -३ आणि स. सा. -५ च्या साक्षीशी येतो. स. सा. -३ अभियोगनुसार घटनेचा एकमेव प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. ते बच्छालाल पाल यांचे पुतणे आहेत. मृत बच्छालाल पाल यांच्या मागे आपण सायकल चालवत होतो, अशी साक्ष त्याने दिली आहे. अपघाताची वेळ रात्री सव्वानऊ ची आहे. निशाणी "२७" खालील जागेचा पंचनामा त्या ठिकाणी पुरेसा प्रकाश होता की नाही हे दर्शवित नाही. संत ज्ञानेश्वर चौक म्हणून या घटनेचे ठिकाण ओळखले जाते. त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, बच्छालाल पाल समोर होते आणि ते त्यांच्या मागे सायकल चालवत होते, तेव्हा अचानक एका कारने बच्छलाल पाल यांना मागून धडक दिली. स. सा. -३ ची हे कथन काहेसे गुंतागुंतीची आहे कारण, अशा परिस्थितीत कारने त्याला प्रथम धडक दिली असती. मात्र, स. सा. -३ ने घटनेच्या घटनेचा तपशील देताना सांगितले आहे की, ते दोघेही शेजारी शेजारी सायकल चालवत होते. ७० फूट रुंदीच्या या रस्त्याच्या दोन्ही बाजूला मधोमध दुभाजक असून मुख्य रस्त्याच्या दुतर्फा दोन सर्व्हिस रोड असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. आपण आणि बच्छलाल पाल आपल्या सायकली शेजारी शेजारी चालवत होतो, असे सांगून त्यांनी मुख्य परीक्षेत आपली साक्ष सुधारली आहे. जर या घटनेतील अभियोग पक्षाच्या एकमेव प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचे हे प्रत्यक्षदर्शी कथन

असेल ज्याच्या आधारे दोषसिद्धी झाली असेल तर ते इच्छित करण्यासारखे बरेच काही शिल्लक राहते. हितसंबंधित साक्षीदाराच्या अशा प्रत्यक्षदर्शी कथनाचा स्पष्ट अर्थ असा होतो की स. सा. -३ प्रत्यक्ष घटनेचा/ अपघाताचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार होऊ शकत नाही, कारण तो आपली सायकल शेजारी चालवत होता. हे अत्यंत गंभीर आणि निर्णायक आहे कारण अशा परिस्थितीत तो बच्छालालला संबंधित कारने दिलेल्या धडकेबद्दल पुष्टी आणि परिपोष करू शकत नाही आणि त्याने ते पाहिले आहे आणि पाहिले आहे आणि अधिक संबंधित कार कोण चालवत आहे याबद्दल अधिक माहिती देऊ शकत नाही. त्याच्या उलटतपासणीत त्याने बच्छालाल यांच्या सायकलला पाठीमागून धडक दिल्याने ते हवेत फेकले गेले आणि रस्त्यावर पडून स्वत:ला जखमी करून घेतल्याची स्वइच्छेने कबुली दिली आहे. त्यानंतर लगेचच त्यांनी सांगितले की, बच्छालाल यांना धडक दिल्यानंतर ते गाडीच्या काचा आणि बोनेटवर पडले. त्यानंतर त्यांनी सांगितले आहे की, धडकेनंतर बच्छालाल रस्त्यावर पडला आणि गाडी पुढे काही अंतरावर थांबली आणि कारमध्ये ४ ते ५ प्रवासी होते ज्यांनी तात्काळ बच्छालाल यांना मदत केली आणि त्याच कारमध्ये बसवून रुग्णालयात उपचारासाठी नेले. आपला प्राथमिक जबाब नोंदवला असता अपघात/घटनेनंतर संबंधित कारचे छायाचित्र काढल्याची माहिती पोलिसांना दिली नसल्याची कबुली त्याने दिली आहे. पोलिसांनी नोंदविलेल्या जबाबात ही माहिती का नाही, याचे उत्तर आपण देऊ शकणार नाही,

याबद्दल त्यांनी अनभिज्ञता व्यक्त करण्याचा आव आणला आहे. पुढे बच्छालाल यांचा २१.०३.२०१८ रोजी मृत्यू झाल्याचे त्याने नमूद केले आहे. उलटतपासणीतील वरील साक्ष आणि कबुलींन पलीकडे, अर्जदाराला दोषी ठरविण्यासाठी किंवा अभ्यारोपित करण्याससाठी अभियोग पक्षाने अभिलेखावर आणलेले अभिलेखाशिवाय दुसरे काहीही अभिलेखावर नाही. सर्व वाजवी शंकांच्या पलीकडे जाऊन अभियोग पक्षाची बाजू सिद्ध करण्यासाठी आणि संबंधित कार अर्जदाराने चालविली होती ती बेदरकारपणे आणि निष्काळजीपणे चालविली गेली होती का ज्यामुळे दुर्दैवी दिवशी अपघात / घटना घडली, बच्छालाल यांचा हानीसहायक निष्काळजीपणा होता का, असा प्रश्न न्यायालयासमोर आहे. ही कार ड्रायव्हरसोबत भाड्याने देण्यात आली होती की नाही हे शोधून काढण्यासाठी तपास अधिकाऱ्यांकडून तपास, कारमधील इतर ३ सह-व्यक्ति /प्रवासी ज्यांनी ही दुर्घटना पाहिली असावी यांची साक्ष अभियोग पक्षाने का घेतली नाही , प्रत्यक्षदर्शी असलेल्या एकाही स्वतंत्र साक्षीदाराची तपासणी का करण्यात आली नाही, हे प्रश्न न्यायालयासमोर आहे. सध्याच्या प्रकरणातील वस्तुस्थिती आणि पुराव्यांमधील वरील सर्व प्रश्नांची उत्तरे मागतात.

१२. सध्याच्या प्रकरणाच्या उपस्थित परिस्थितीत स. सा. ५ - उत्तरा राशीनकर यांची साक्ष अत्यंत निर्णायक आहे. ती अपघाताची/घटनेची प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. बच्छालाल यांच्या सायकलला धडक देणाऱ्या संबंधित कारची ती सह व्यक्ति/प्रवासी

होती. तिचे साक्षी पुरावे दोन भागांत आहेत; पहिली गोष्ट म्हणजे तिने तिच्या सरतापासणीत घडलेल्या घटनांचे नेमके पालट सांगितले आहेत आणि दुसरे म्हणजे तिची उलटतपासणी ज्यात ती वस्तुस्थितीला विशेषपणे निश्चित करते. अपघात झाला तेव्हा ती स्वत:, तिचे सहप्रवासी भूमिका, शुभंकर आणि प्रेसेनजीत यांच्यासह संबंधित कारचा ड्रायव्हर अशी लोक त्या कार मध्ये होत्या, अशी साक्ष तिने दिली आहे. हॉटेल फासोस मध्ये रात्री ८ ते ९ या वेळेत जेवण करून ते पुण्याकडे परतत होते. पुण्याच्या दिशेने जाण्यासाठी यू-टर्न घेतल्यानंतर अचानक त्यांच्या कारच्या डाव्या हाताने बच्छालाल यांनी त्यांच्या कारला धडक दिली आणि ते जमिनीवर फेकले गेले. गाडी थांबवून त्यातील सर्व जण खाली उतरले आणि त्यांनी बच्छालाल यांना जखमी अवस्थेत पाहिले, अशी साक्ष तिने दिली आहे. त्यानंतर कार चालवणारा कारचालक पळून गेल्याची स्पष्ट कबुली तिने दिली आहे. त्यानंतर शुभंकर आणि प्रेसेनजीत (अर्जदार) यांनी बच्छालाल यांना मदत केली आणि जवळच्या रुग्णालयात नेले. ही कार टूर अँड ट्रॅव्हल्स कंपनीकडून भाड्याने घेण्यात आली होती, मात्र कार चालवणाऱ्या व्यक्तीचे नाव तिला माहित नव्हते, अशी ठाम साक्ष तिने दिली आहे. पोलिसांनी तिच्याकडे चौकशी केली असता तिने वरील वस्तुस्थिती व घटना पोलिसांना सांगितली आणि जबाब नोंदवला, अशी साक्ष तिने दिली आहे. अपघात झाला तेव्हा अर्जदार कार चालवत होता, या वस्तुस्थितीचे तिने ठामपणे खंडन केले आहे. त्यानंतर तिने साक्ष

दिली आहे की, पोलिसांनी आपल्या जबाबात अर्जदार संबंधित गाडी चालवत नव्हता, ही वस्तुस्थिती का नोंदवली नाही हे सांगण्याच्या स्थितीत ती नव्हती. तिने साक्ष दिली आहे की, बच्छालाल यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांना समजले की अर्जदारला अटक करण्यात आली आहे, जेव्हा तिच्या म्हणण्यानुसार अर्जदाराने अपघात केला नाही आणि तो भाड्याच्या कारच्या ड्रायव्हरने केला आहे. वरील जबाबावर तिची उलटतपासणी महत्त्वाची मानली जाते कारण तिची विशेष चौकशी केली असता तिने अपघात घडल्यानंतर कारचालक पळून गेल्याचे उत्तर दिले आहे. स. सा. - ५ चे प्रत्यक्षदर्शी कथन विश्वासार्ह आहे कारण ते पूर्णपणे अनाक्षेपित राहिली आहे. दोघेही एकाच कंपनीत काम करत असल्याने अर्जदाराशी ओळख असूनही उलटतपासणीत तिचा जबाब डगमगित झालेला नाही.

१३. तपास अधिकाऱ्याने स. सा. -६ अशी साक्ष दिली आहे. तो एवढेच सांगतो की अर्जदार कार चालवत होता आणि म्हणून त्याला अटक करण्यात आली, जेव्हा अभियोग पक्षाच्या दोन विशिष्ट साक्षीदारांनी संबंधित कारमधील लोकांचा तपशील आणि संबंधित कार भाड्याने घेतल्याची वस्तुस्थिती, अपघात घडल्यानंतर विषय कारमधील लोकांचा तपशील, अपघात घडल्यानंतर पळून गेलेल्या संबंधित कारचा ड्रायव्हर, अपघात झाला तेव्हा अर्जदार गाडीचा चालक नव्हता, ही वस्तुस्थिती असल्याने अभियोग पक्षाने यासंदर्भात योग्य ती चौकशी व तपास करायला हवा होता.

वरील प्रश्नांवर प्रकाश टाकणारे काहीही तपास अधिकाऱ्याने केलेल्या तपासात नाही. तपास अधिकाऱ्याने आपल्या पुराव्यात वर नमूद केल्याप्रमाणे वस्तुस्थिती सांगितली आहे आणि उलटतपासणीत कबूल करून सांगितले आहे की, ज्या रस्त्यावर अपघात झाला तो रस्ता बऱ्यापैकी रुंदीचा ४ पदरी रस्ता असून दोन्ही बाजूला सर्व्हिस रोडदेखील आहेत. आरटीओ अहवालावरील परिच्छेद क्रमांक ६ मधील निशाणी - "२९" मध्ये त्यांनी कबूल केले आहे की, कार मध्ये वेग नियंत्रण यंत्रणा बसविण्यात आली होती आणि त्यामुळे ती वेगाने चालवता येत नव्हती. अपघाताच्या परिणामाबाबत त्यांनी सांगितले आहे की, एअर बॅग फुगल्या नाहीत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे गाडीच्या डाव्या हाताच्या बाजूस त्याचा परिणाम झाला आणि काही ओरखाडे होते आणि डाव्या हाताची काच तुटली होती. तपास अधिकाऱ्याची ही साक्ष निशाणी - "२९" सह स्पष्टपणे वाचली असता हे दर्शविते की सायकलच्या पाठीमागून होणारी धडक आणि टक्कर यांची अभियोग पक्षाची मीमांसा योग्य नाही. म्हणूनच हे स्पष्ट आहे की स. सा. -३ ने वर निरीक्षण आणि वर्णन केल्याप्रमाणे त्याचे कथन सुधारण्याचा प्रयत्न केला आहे. त्याशिवाय बच्छालाल यांनी रस्त्यावर सायकल चालविण्याकडे दुर्लक्ष केल्याचा पैलू नाकारता येत नाही. धडक पाठीमागून नसून त्याच्या सायकलने डावीकडून संबंधित कारला धडक दिल्याचे पुरावे आहेत. याची पुष्टी निशाणी - "२९" खालील आरटीओ अहवालाने केली आहे.

१४. या संदर्भात प्रेमलाल आनंद आणि इतर विरुद्ध नरेंद्र कुमार आणि इतर[1] या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय महत्वाचा असून त्यातील परिच्छेद क्र.११ व १२ तात्काळ संदर्भासाठी खाली उद्धृत करण्यात आले आहेत:-

"११. या टप्प्यावर, हानिसहाय्यक निष्काळजीपणाबद्दल या न्यायालयाच्या निर्णयांचा विचार करणे योग्य ठरेल.

११.१ बृहन्मुंबई महानगरपालिका विरुद्ध लक्ष्मण अय्यर व अन्य १ या प्रकरणात या न्यायालयाने निष्काळजीपणाची संकल्पना व त्याचे प्रकार म्हणजे संमिश्र व सहाय्यकारी, यांची चर्चा खालील शब्दांत केली:-

"६ . .... निष्काळजीपणा म्हणजे एकतर एखाद्या समजूतदार माणसाने त्या विचारांवर मार्गदर्शन केलेले, जे सामान्यत: मानवी व्यवहारांच्या आचरणामुळे करेल किंवा बंधनकारक असेल किंवा असे काही तरी केल्याने कर्तव्यात झालेली चूक आहे जी समंजस किंवा सुजाण माणूस करणार नाही. निष्काळजीपणा म्हणजे नेहमीच निरपवाद निष्काळजीपणा नव्हे, तर विशिष्ट परिस्थितीत आवश्यक तेवढी काळजी न घेणे. निष्काळजीपणा म्हणजे दुसऱ्या व्यक्तीच्या हिताच्या रक्षणासाठी, परिस्थितीने न्याय्य पणे आवश्यक असलेली काळजी, खबरदारी आणि दक्षता पाळण्यात अपयश, ज्यामुळे अशा दुसऱ्या

1 एसएलपी (सी) क्रमांक 30188-30189/२०१८ मधून उद्भवलेल्या दिवाणी अपीलावर 07.08.2024 रोजी निर्णय देण्यात आला.

व्यक्तीला इजा होते. निष्काळजीपणा आणि कर्तव्य ही कल्पना काटेकोरपणे परस्परसंबंधी आहे. निष्काळजीपणा म्हणजे एकतर व्यक्तिनिष्ठपणे निष्काळजी मनःस्थिती, किंवा वस्तुनिष्ठपणे निष्काळजी वर्तन. निष्काळजीपणा हा निरपेक्ष शब्द नाही , तर तो सापेक्ष शब्द आहे ; हा एक तुलनात्मक शब्द आहे. कोणतेही निरपेक्ष मानक निश्चित केले जाऊ शकत नाही आणि कोणतेही गणितीय अचूक सूत्र निर्धारित केले जाऊ शकत नाही ज्याद्वारे एखाद्या प्रकरणात निष्काळजीपणा किंवा कमतरता अचूकपणे मोजली जाऊ शकते. निष्काळजीपणा म्हणजे काय हे वेगवेगळ्या परिस्थितीत बदलते आणि एखाद्या विशिष्ट प्रकरणात निष्काळजीपणा अस्तित्वात आहे की नाही किंवा निव्वळ कृती किंवा वर्तन निष्काळजीपणा आहे की नाही हे ठरविताना, उपस्थित आणि आजूबाजूची सर्व वस्तुस्थिती आणि परिस्थिती विचारात घ्यावी लागते. परिस्थितीनुसार काळजी न घेणे ही ती बाब आहे. एखादी कृती निष्काळजी असेल की नाही हे ठरविण्यासाठी, त्या कृतीमुळे नुकसान होईल की नाही याचा अंदाज कोणत्याही समंजस माणसाला येईल की नाही हे ठरविणे समर्पक आहे. कायद्याने जे बंधनकारक केले आहे ते न करणे किंवा कायद्याने ठरवून दिलेल्या पद्धतीने, मार्गाने किंवा प्रकाराने काहीही करण्यात अपयशी ठरणे हे अशा व्यक्तीचा निष्काळजीपणा ठरेल.

उत्तर होकारार्थी असेल तर ते निष्काळजीपनाचे कृत्य आहे. जिथे दोन्ही पक्षकारांच्या हानिसहाय्यक निष्काळजीपणामुळे अपघात होतो, तेथे मोठ्या प्रमाणात निष्काळजीपणा होईल आणि दोघांनाही दोषी धरले जाईल. हानीसहाय्यक निष्काळजीपणाच्या बाबतीत, कोणती जबाबदारी अवलंबून आहे हा महत्त्वाचा प्रश्न असा असेल की एक पक्ष, वाजवी काळजी घेऊन, दुसऱ्याच्या निष्काळजीपणाचा परिणाम टाळू शकला असता का? ...

हानिसहाय्यक निष्काळजीपणा केवळ वादीच्या वर्तनास लागू होतो. याचा अर्थ असा की वादीकडून असे कृत्य किंवा अकृति झाली आहे ज्यामुळे नुकसान झाले आहे, कृत्य किंवा चूक अशा स्वरूपाची आहे की त्याचे योग्य वर्णन निष्काळजीपणा म्हणून केले जाऊ शकते, जरी निष्काळजीपणाला त्याचा नेहमीचा अर्थ दिला जात नाही. .... हानीसहाय्यक निष्काळजीपणाच्या प्रकरणात न्याय्य आणि समन्यायी वाटणाऱ्या पक्षकारांमधील तोटा वाटून घेण्याचा अधिकार न्यायालयांना आहे, हे आता सर्वमान्य झाले आहे.

(जोर दिला आहे)

११.२ प्रमोदकुमार रसिकभाई झवेरी विरुद्ध करमासे कुंवर्गी टाक आणि इतर या प्रकरणात या न्यायालयाने[2] खालीलप्रमाणे मत व्यक्त केले:

2(२००२) ६ एससीसी ४५५

९. कर्तव्याच्या अस्तित्वाची आवश्यकता नसल्याच्या अधिन प्रतिवादीच्या निष्काळजीपणाचा प्रश्न ज्या तत्त्वावर ठरवला जातो, त्याच तत्त्वावर हानीसहाय्यक निष्काळजीपणाच्या प्रश्नावर निर्णय घ्यावा लागतो. वादीच्या हानीसहाय्यक निष्काळजीपणाच्या बाबतीत समंजस माणसाचा दर्जा जितका महत्वाचा आहे तितकाच प्रतिवादीच्या निष्काळजीपणाच्या बाबतीतही आहे. परंतु काळजीच्या अभावाचे प्रमाण जे हानीसहाय्यक निष्काळजीपणा प्रस्थापित करत, ते परिस्थिती आणि प्रकरणाच्या वस्तुस्थितीनुसार बदलते. ऑस्ट्रेलिया उच्च न्यायालयाचे अॅस्टली विरुद्ध ऑट्रस्ट लिमिटेड [(१९९९) ७३ एएलजेआर ४०३] या खटल्यात खालील निरीक्षण उद्धृत करण्यासारखे आहे:

"वादी आपल्या व्यक्तीची किंवा मालमत्तेची योग्य काळजी घेण्यात अपयशी ठरल्याने त्याच्या/तिच्या स्वतःच्या नुकसानीस हातभार लावला आहे की नाही याची वास्तविक तपासणी केली जाते. वाजवी काळजी काय आहे हे प्रकरणाच्या परिस्थितीवर अवलंबून असते. बऱ्याच प्रकरणांमध्ये, वादीने आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रतिवादीवर अवलंबून राहणे योग्य ठरू शकते. पण निरपवाद नियम नसतो. प्रतिवादीची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या हे हानीसहाय्यक निष्काळजीपणा अस्तित्त्वात आहे की नाही आणि तसे असल्यास, किती प्रमाणात आहे हे निर्धारित करण्यासाठी परिवर्तनशील घटक

आहेत. काही प्रकरणांमध्ये, पार पाडवयाच्या कर्तव्याचे स्वरूप वादीला हानीसहाय्यक निष्काळजीपणाच्या दाव्यापासून दोषमुक्त करू शकते ; इतर प्रकरणांमध्ये, कर्तव्याच्या स्वरूपामुळे झालेल्या नुकसानीसाठी फिर्यादीचा जबाबदारीचा वाटा कमी होऊ शकतो; आणि इतर प्रकरणांमध्ये कर्तव्याचे स्वरूप हे या निष्कर्षास रोखू शकत नाही की वादी त्याच्या शरीराच्या किंवा मालमत्तेच्या सुरक्षिततेची वाजवी काळजी घेण्यात अपयशी ठरला. हानीसहाय्यक निष्काळजीपणा वादीच्या वर्तनावर लक्ष केंद्रित करतो. प्रतिवादीद्वारा ज्या कर्तव्याची आवश्यकता होती, ती जरी प्रसंगोचीत होती, तरी ती अनेक कारणीभूत परिस्थितींन पैकी केवळ एक आहे ज्याचे महत्व या निर्धारणात आहे की वादींनी स्वतःची वागणूक अशी ठेवली की, त्याबाबत स्वतःच्या शरीराच्या किंवा मालमतेच्या रक्षणासाठी वाजवी काळजी घेण्यास कसूर झाली.

(जोर दिला आहे)

१२. अभिलेखावरून असे दिसून आले आहे की ट्रॅक्टर क्रमांक यूपी १४ -ए १९३३ च्या चालकाने संथ गती राखली होती, आणि दावा सांगणारा - अपीलकर्ता क्रमांक १ ला ओव्हरटेक करण्यास सूचित केले, परंतु, अन्य ट्रॅक्टर क्र.यूपी १४ -बी ९६०३ चा चालकने आपल्या कृत्यात बेदकारपणे

आणि हलगर्जीपणा केला, इतकेच नव्हे तर तो चुकीच्या बाजूने देखील आला, परिणामी टक्कर झाली."

१५. तपासादरम्यान संबंधित कारमधील प्रवाशांनी अपघाताच्या वेळी अर्जदार कार चालवत नसल्याची माहिती दिली होती, असे तपास अधिकाऱ्यांना विचारले असता, त्यांनी त्यांचे खंडन करत संबंधित कार कोण चालवत आहे, याची माहिती देण्यास नकार दिला आहे. मात्र, ही कार भाड्याने घेतलेली कार होती, त्यामुळे अपघाताच्या वेळी कार कोण चालवत होते, हे शोधून काढणे अभियोग पक्षासाठी अधिक महत्त्वाचे होते, अशी कबुली त्यांनी दिली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित कार बेदरकारपणे आणि निष्काळजीपणाने चालविल्याचा आरोप करणारे कोणतेही साहित्य अभिलेखावर ठेवण्यात आलेले नाही.

१६. कार भाड्याने देणाऱ्या कंपनीचे टीम लीडर असलेल्या स. सा. -१ ने कार कोण चालवत होते याबाबत कोणताही पुरावा दिलेला नाही किंवा त्यांच्या कंपनीकडून भाड्याने घेतलेली कार सुपूर्द करण्याबाबतही तपशील दिलेला नाही. उलट सकाळी गाडी नेली तेव्हा तो उपलब्ध नव्हता, अशी कबुली त्यांनी दिली आहे. त्यांच्या उलटतपासणीच्या परिच्छेद क्रमांक १२ मध्ये तपास अधिकाऱ्याने स. सा. -३ - रामसावरे पाल यांनी आपल्या उपस्थितीत विशेष जबाब नोंदवला आहे की, गाडी थांबल्यानंतर त्यांना कारमधून ३ मुले आणि २ मुली बाहेर येताना दिसले. ही कार आय

२० कार आहे जी ५ सीटर कार होती ज्यात समोर २ बकेट सीट आणि मागच्या बाजूला ३ प्रवासी बसण्यासाठी एक सोफा सीट होती. स. सा. -३ हा कारमधील व्यक्तींशी संबंधित वस्तुस्थितीचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असल्याचा दावा करणारा हा पुरावा विचारात घेतला तर कारमधील ३ मुले नक्कीच ; (१) शुभंकर; (२) प्रेसेनजीत (अर्जदार) आणि (३) कारचा चालक असतील. दोन मुली - (१) उत्तरा राशीनकर (स. सा. -५) आणि (२) भूमिका शर्मा या कारमधील दोन प्रवासी आहेत

१७. वरील बाबी लक्षात घेता आणि अपघात झाला तेव्हा कारमध्ये बसलेल्या स. सा. -५ या अभियोग साक्षीदाराची विशिष्ट साक्ष लक्षात घेता, स. सा. -३ ने कारमधील ५ प्रवाशां बाबत केलेल्या कथनाचा मुद्दा मिटला. स. सा. -५ ने आपल्या जबाबात स्पष्टपणे म्हटले आहे की, संबंधित कार अर्जदाराने चालवली नव्हती. ही कार कंपनीच्या ड्रायव्हरने चालवली होती, या सिद्धांताला ती भाड्याने घेतलेली कार होती, त्यातील ५ पैकी ४ जणांची नि:संदिग्धपणे ओळख पटली आहे, अपघातानंतर स. सा. -३ ला ३ मुले आणि २ मुली कारमधून उतरताना दिसल्या आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे भाड्याने घेतलेल्या कारच्या ड्रायव्हरची चौकशी आणि तपास करण्यात तपास अधिकाऱ्याची कर्तव्यचुती आणि चूक _या वस्तुस्थितीमुळ बळ मिळते.

१८. वरील बाबी लक्षात घेता माझे असे मत आहे की,सर्व वाजवी शंकांच्या पलीकडे अभियोग पक्षाचा खटला सिद्ध झालेला नाही. अर्जदार कार चालवत होता या गोष्टीची

अजिबात तपासणी करण्यात आलेली नाही. जोवर या अपघातात कारच्या धडकेबाबत बोलायचे झाले तर बच्छालाल यांच्या सायकलचा कारवर डाव्या हाताच्या बाजूने होती आणि कारने सायकलला पाठीमागून धडक दिली नसल्याचे नोंदीवरून स्पष्ट झाले आहे. अपघातातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराच्या (स. सा. -५) पुराव्यांवरून ही बाब समोर आली आहे. बच्छालाल यांच्या सायकलने कारला डाव्या हाताच्या बाजूला धडक दिली त्याची अनेक कारणे असू शकतात. वाहन चालविणाऱ्या चालकाने कारने धडक दिल्याचे प्रमाण हे निःसंशयपणे हानीसहायक निष्काळजीपणा ठरेल, परंतु हे सर्व प्रत्येक प्रकरणाच्या वस्तुस्थितीवर अवलंबून असेल. स्थळाचा पंचनामा व तपास अधिकाऱ्यांच्या जबाबावरून असे दिसून आले की, प्रकरणातील रस्त्याच्या दुतर्फा दोन सर्व्हिस रोड होते, तरीही रामसावरे पाल (स. सा. -३) आणि बच्छालाल यांनी आपल्या सायकलवरून वाहनांच्या रहदारीचा रस्त्यावरून जाणे पसंत केले. त्या कारणास्तव त्यांना दोषी धरत येत नसला, तरी अपघात घडण्यास कारणीभूत ठरणाऱ्या वस्तुस्थितीचा विचार होणे गरजेचे आहे.

१९. वर चर्चा केलेले साक्षीपुरावे लक्षात घेता एक प्रश्न/वस्तुस्थिती स्पष्टपणे अनुत्तरित राहते ती म्हणजे ती कार अर्जदाराने चालविली होती की भाड्याने घेतलेल्या कारच्या ड्रायव्हरने.? कार भाड्याने देणाऱ्या कंपनीचे प्रतिनिधी स. सा. -१ यांनी ही कार अर्जदाराला दिली होती की अर्जदाराने चालविली होती, अस सुचवणारे काही आरोप

ठेवणारे काहीही सांगितलेले नाही किंवा तपास अधिकाऱ्याने वरील वस्तुस्थितीचा तपास केलेला नाही.

२०. त्यामुळे अभियोग पक्षाने सर्व वाजवी शंकांच्या पलीकडे आपली बाजू सिद्ध केलेली नसल्याने संशयाचा लाभ अर्जदाराला द्यावा लागेल. त्यामुळे दिनांक २८.०९.२०२१ आणि २४.०३.२०२३ रोजीचे आक्षेपार्ह निर्णय टिकण्यासारखे नाहीत आणि ते रद्द केले जातात. परिणामी, अर्जदाराची दोषसिद्धी आणि शिक्षा रद्द केले जातात.

२१. अर्जदाराने सादर केलेला जामीन बंधपत्र रद्द करण्याचे निर्देश दिले जातात.

२२. वरील निर्देशांसह, फौजदारी पुनरीक्षण अर्ज मंजूर केला जातो आणि निकाली काढला जातो.

[न्या. मिलिंद एन. जाधव]

-x-x-x-x-x-x-

## अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

-x-x-x-x-x-x-